प्रेसनोट दिनांक २०/१०/२०२३

आरोपी लोकसेवक निवास वसंत पाटील, वय ४३ वर्षे, पद-निमतानदार वर्ग -३, उपअधीक्षक,,भूमी अभिलेख कार्यालय, आजरा ता. आजरा जि.कोल्हापूर रा.सामंत कॉम्पलेक्स, प्रा.आ.केंद्र रोड, आजरा ता. आजरा, जि.कोल्हापूर, मुळ रा.मु.पो. कसबा वाळवे ता. राधानगरी, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........

---

तक्रारदार यांचे प्रॉपर्टी कार्डावर तक्रारदार त्यांची आई,वडील,भाऊ यांचे नावाची नोंदणी करुन प्रॉपर्टी कार्ड मिळणे करीता उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, आजरा ता.आजरा जि. कोल्हापूर यांचे कार्यालयात अर्जदार यांनी अर्ज केला होता. सदर प्रॉपर्टी कार्डावर नाव नोंदणी करुन प्रापर्टी कार्ड देण्यासाठी सदर उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, आजरा येथील निमतानदार यांनी तक्रारदार यांचेकडे ६,०००/-रूपयांची मागणी केली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे आज दि.२०/१०/२०२३ रोजी पडताळणी केली असता पडताळणीमध्ये तक्रारदार यांचे तसेच कुटुंबातील सदस्यांची नावे मिळकतीचे प्रॉपर्टी कार्डवर नोंदणी करण्याकरीता उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, आजरा या कार्यालयातील निमतानदार यांनी तक्रारदार यांचेकडे ६,०००/-रूपयांची मागणी केल्याचे निषन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक निवास वसंत पाटील, वय ४३ वर्षे,पद-निमतानदार वर्ग -३, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, आजरा ता. आजरा जि.कोल्हापूर रा.सामंत कॉम्पलेक्स, प्रा.आ.केंद्र रोड, आजरा ता. आजरा, जि.कोल्हापूर, मुळ रा.मु.पो. कसबा वाळवे ता. राधानगरी, जि.कोल्हापूर यांनी ६,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले.

सदरबाबत आरोपी लोकसेवक निवास वसंत पाटील, वय ४३ वर्षे, निमतानदार वर्ग -३, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, आजरा ता. आजरा जि.कोल्हापूर रा.सामंत कॉम्पलेक्स, प्रा.आ.केंद्र रोड, आजरा ता.आजरा, जि.कोल्हापूर, मुळ रा.मु.पो. कसबा वाळवे ता. राधानगरी, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द आजरा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे तसेच श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक बापु साळुंके, सपोफौ/प्रकाश भंडारे,पो.हे.कॉ. श्री सुनिल घोसाळकर,पोना/संदिप काशिद, चा.पो.हे.कॉ. विष्णु गुरव ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१
२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.
४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४.
५) व्हॉटस अप क्रमांक :- ७८७५३३३३३३.